आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – दु. ३.००वाजता
३ मार्च २०२१ – बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- केंद्रीय अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींमुळे, शिक्षण रोजगाराभिमुख करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांची व्याप्ती वाढली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्य सरकार मागच्या सरकारच्या काळात राबवल्या गेलेल्या वृक्ष लागवड योजनेसंदर्भात विधामंडळाच्या संयुक्त समितीद्वारे चौकशी करणार

- आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या नगरपालिकांना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्याची नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत ग्वाही

- देशात आतापर्यंत १ कोटी ५६ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांचं कोरोना प्रतिबंधक लसीकरण

- राज्यात काल ६ हजार ३३२ रुग्ण कोरोनामुक्त / तर ७ हजार ८६३ नव्या रुग्णांची नोंद

<><><><>

केंद्रीय अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींमुळे, शिक्षण रोजगाराभिमुख करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांची व्याप्ती वाढली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षणक्षेत्रासाठी केलेल्या तरतुदींविषयी आयोजित वेबिनारमधे बोलत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात आरोग्याच्या खालोखाल शिक्षण, कौशल्य, संशोधन आणि नव्या कल्पनांवर जास्त लक्ष दिलेलं आहे, असं त्यांनी सांगितलं. आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी तरुणांमधे आत्मविश्वासाची गरज आहे, आणि या आत्मविश्वासाचा थेट संबंध त्यांचं शिक्षण, ज्ञान आणि कौशल्याशी आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

राज्यभरात मागच्या सरकारच्या काळात राबवल्या गेलेल्या ५० कोटी वृक्ष लागवड योजनेसंदर्भात विधिमंडळ सदस्यांची संयुक्त समिती नेमून चौकशी केली जाईल अशी घोषणा वन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानसभेत केली. राजकारणासाठी मागच्या गोष्टींचा वापर केला जात असल्याची टीका विरोधी पक्षनेते देवेंद्र फडनवीस, सुधीर मुनगंटीवार यांनी,यावेळी म्हणाले.

नाशिक मधल्या बिरवाडी येथील दलित तरुणानं पोलीस अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा मुद्दा देवयानी फरांदे यांनी उपस्थित केला. याप्रकरणी तातडीनं कारवाईची मागणी त्यांनी केली. संध्याकाळपर्यंत निलंबन कारवाईचं आश्वासन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिलं.

जळगावमधे एका तरुणीला धाक दाखवत नग्न चित्रफीत करणाऱ्या पोलिसांवर तातडीनं कारवाई करायची मागणी स्थानिक आमदार श्वेता महाले यांनी केली. त्यावर नोंद घेतली या गृहमंत्र्यांच्या उत्तरानं सुधीर मुनगंटीवार चांगलेच भडकले. त्यावर स्थानिक वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमली असून दोन दिवसात अहवाल आल्यावर कारवाई केली जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

राज्यातल्या शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळाली नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते देवेंद्र फडनवीस यांनी केला. याबाबत निवेदन करण्याचे निर्देश सरकारला द्यावेत, असा आग्रह उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याकडे धरला. त्यावर त्यांनी सरकार काळजी घेत आहे असं म्हंटल्यावर, सरकार काळजीवाहू आहे असा टोला लगावला. विरोधकांनी आक्रमक होत घोषणाबाजी सुरू केली. अखेर त्यात हस्तक्षेप करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लवकरच सरकार निवेदन करेल,असं सांगितलं. त्यानंतर गोंधळ थाबला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीसाठी निर्माण केलेल्या समता प्रतिष्ठानच्या कथित गैरकारभाराविषयी संपूर्ण चौकशी करण्याची घोषणा समाजकल्याण मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात केली. यासाठी सांबधित १६ कोटी रुपयांच्या

बाबीविषयी बार्टी महासंचालक, समाज कल्याण आयुक्त, खात्याचे प्रधान सचिव यांच्या समितीच्या अहवालानुसार कारवाई होईल. मात्र यात संबंधित मंत्र्यांचा सहभाग दिसत नसल्याचे नाना पटोले यांच्या उपप्रश्नात त्यांनी स्पष्ट केलं.

<><><>

राज्यातल्या, आर्थिक स्थिती बेताची असणाऱ्या नगरपालिकांना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल, असं नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

नागपूर महानगरपालिकेला मूलभूत सोयी सुविधा योजनेअंतर्गत निधी प्राप्त झाला नसल्याबाबत भाजपाचे प्रवीण दटके यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता, या प्रश्नाच्या चर्चेदरम्यान शिंदे बोलत होते. कोविड १९ च्या संकटामुळे राज्य सरकारच्या खर्चावर मर्यादा आली असली तरी नगरविकास खात्याकडून विकासकामं थांबवली जाणार नाहीत. ज्या विकासकामांचे कार्यादेश निघाले ती कामे थांबवली नाहीत. जी कामे सुरू आहेत ती थांबू नयेत, आणि प्राधान्यक्रमानुसार कामं व्हावीत, अशीच सरकारची भूमिका असल्याचं सांगत, एकनाथ शिंदे यांनी सभागृहाला आश्वस्त केलं.

<><><>

केंद्र सरकारनं कोविड लसीकरणासंदर्भात वेळेची मर्यादा काढून टाकली असून आता दिवसभराच्या चोविस तासात कधीही लसीकरण करता येणार आहे. यासंदर्भात रुग्णालयांनी वशिष्ट वेळेचा आग्रह न धरता आठवडाभर दिवसरात्र लसीकरण करावं, असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी केलं आहे. यामुळे लसीकरणासाठीची गर्दी टाळता येईल अधिकाधिक लोकांचं लसीकरण करता येईल, असंही ते म्हणाले. हा निर्णय खाजगी तसंच सरकारी रुग्णालयात लागू राहिल. केंद्राकडे लसीचा पुरेसा साठा असून सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या लसीकरण केंद्रांना तो वेळेवर पूरवला जाईल, असंही डॉ. हर्षवर्धन म्हणाले.

<><><>

केंद्रीय मंत्रिमंडळाने भारत आणि फिजी या देशादरम्यान कृषी आणि संबंधित क्षेत्रातल्या कराराला मजूंरी दिली आहे. या कराराद्वारे भारत आणि फिजी दरम्यान संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञान तज्ञाची सेवा देणं, कृषी विकासासाठी पायाभूत सुविधाचा विकास, दोन्ही देशातल्या संयुक्त प्रकल्पांना चालना देणं ह्यासंदर्भातल्या सहयोगाला प्राधान्य देण्यात आलं आहे. भारत- फिजी कार्यकारी गटाची स्थापना करायचं उद्धिष्टही निश्चित करण्यात आलं आहे.

भारत आणि फ्रान्सदरम्यान अक्षय ऊर्जासंदर्भात झालेल्या सामंजस्य कराराचा आढावादेखील आजच्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हा करार जानेवारी महिन्यात झाला असून त्यात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, तसंच हॉयड्रोजन आणि बायोमास ऊर्जेसंबंधी क्षेत्राचा समावेश आहे.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक वन्यजीव दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. वन्यप्राण्यांचं संरक्षण आणि जतन करणाऱ्यांना माझा सलाम आहे. भारताचा वन्यप्राण्यांचा आलेख वाढत असून, त्याचा आपल्याला अभिमान आहे, असं त्यांनी आपल्या ट्विटर संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, भारतातून नामशेष झालेल्या चीता या प्रजातीला पुन्हा भारतात आणण्याचा प्रयत्न असल्याचं पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी सांगितलं. वन्यजीव दिनानिमित्त ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहरांशी बोलत होते. १९५२ पासून चीता भारतातून नामशेष झाला आहे. म्हणून हे विशेष अभियान राबवलं जाणार आहे. सध्या जगाच्या ७० टक्के वाघ भारतात आहेत. आशियाई सिंहांचं प्रमाण देखील ७० टक्के आहे. जगातले ६० टक्के बिबटे भारतात आहेत, असंही ते म्हणाले.

<><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अर्थात एम एम आर डी ए आयुक्त आर. ए. राजीव यांचा सेवा कार्यकाळ ३ महिन्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. एम एम आर डी ए मार्फत मेट्रो रेल्वे मार्ग, मुंबई पारबंदर अशा विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची कामं प्रगतीपथावर आहेत. एम एम आर डी ए आयुक्त हे पद प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाचं असून आर. ए. राजीव यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा फायदा हा प्राधिकरणामार्फत राबवण्यात येत असलेल्या प्रकल्पांसाठी व्हावा, म्हणून हा कालावधी वाढवला आहे. १ मार्च ते ३१ मे २०२१ या कालावधीकरता कंत्राटी तत्वावर त्यांची नियुक्ती केली आहे.

<><><>

देशात आतापर्यंत १ कोटी ५६ लाखापेक्षा जास्त लाभार्थ्यांचं कोरोना प्रतिबंधक लसीकरण झालं आहे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आज नवी दिल्लीतल्या आर. आऱ.रुग्णालयात जाऊन लसीचा पहिला डोस घेतला.

कोविड-१९ चे रुग्ण बरे होण्याचा दर ९७ पूर्णांक ६ शतांश टक्के झाला आहे. काल देशभरात १३ हजारापेक्षा जास्त रुग्ण बरे होऊन घरी गेले. आतापर्यंत कोरोनामुक्त झालेल्यांची संख्या १ कोटी ८ लाख १२ हजाराच्यावर गेली आहे. काल सुमारे १५ हजार नव्या कोरोनाबाधितांची नोंद झाली, त्यामुळे देशात आतापर्यंत कोरोनाची लागण झालेल्यांची एकूण संख्या १ कोटी ११ लाखाच्यावर गेली आहे. काल ९८ रूग्णांचा मृत्यू झाला.

<><><><>

राज्यात काल ६ हजार ३३२ रुग्ण या संसर्गातून मुक्त झाले. राज्यात आतापर्यंत २० लाख ३६ हजार ७९० रुग्ण, कोरोनामुक्त झाले आहेत. राज्याचं रुग्ण बरे होण्याचं प्रमाण ९३ पूर्णांक ८९ शतांश टक्के झालं आहे. काल ७ हजार ८६३ नव्या रुग्णांची नोंद झाली, त्यामुळे राज्यातल्या कोविड बाधितांची एकूण संख्या २१ लाख ६९ हजार ३३० झाली आहे. सध्या राज्यभरात ७९ हजार ९३ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. काल ५४ रुग्णांचा मृत्यू झाला. राज्यात या आजारामुळे ५२ हजार २३८ रुग्ण दगावले असून, मृत्यूदर २ पूर्णांक ४१ शतांश टक्के झाला आहे.

<><><><>

मुंबईत काल ९०३ रुग्ण बरे झाल्यानं त्यांना घरी पाठवण्यात आलं. आतापर्यंत ३ लाख ५ हजार ६३९ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. काल ८४९ नवीन रुग्णांची नोंद झाली. आतापर्यंत रुग्णांची संख्या ३ लाख २७ हजार ६१९ झाली आहे. मुंबईतला रुग्ण दुपटीचा कालावधी २४२ दिवस झाला आहे. सध्या ९ हजार ६३३ रुग्ण उपचार घेत आहेत. काल २ रुग्णांचा मृत्यू झाला असून, एकूण मृतांचा आकडा ११ सहजार ४७६ वर पोचला आहे.

<><><><>

**हिंगोली** जिल्ह्यात काल १० तर आतापर्यंत ३ हजार ८३९ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. काल ५६ नवीन रुग्णांची नोंद झाल्यामुळे, रुग्ण संख्या ४ हजार १९५ झाली आहे. सध्या जिल्ह्यात २९६ रुग्ण उपचार घेत आहेत.

**परभणी** जिल्ह्यात काल ४३ रुग्ण बरे होऊन घरी गेले. जिल्ह्यात आतापर्यंत ८ हजार १३९ रुग्ण या आजारातून बरे झाले आहेत काल नवे ३१ रुग्ण आढळल्यामुळे, एकूण रुग्णांची संख्या ८ हजार ६०७ झाली आहे. सध्या जिल्ह्यात १४१ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. जिल्ह्यात या आजारामुळे ३२७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे

**नांदेड** जिल्ह्यात काल बरे झालेल्या ५६ रुग्णांना घरी पाठवण्यात आलं. जिल्ह्यात आतापर्यंत २२ हजार ३८५ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ९३ रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आल्यामुळे रुग्ण संख्या वाढून २३ हजार ८३७ झाली आहे. सध्या ६१६ रुग्णांवर उपचार केले जात आहेत जिल्ह्यात या आजारामुळे ६०२ रुग्ण दगावले आहेत.

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल १७ रुग्णांना रुग्णालयातून सुट्टी दिली. जिल्ह्यात आतापर्यंत ९ हजार ४७८ रुग्ण बरे होऊन घरी परतले. काल १३ रुग्णांना या आजाराची लागण झाल्यामुळे, रुग्णांचा आकडा १० हजार १२ झाला आहे. सध्या १३६ रुग्ण उपचाराधीन आहेत. जिल्ह्यात या आजारानं ३६७ रुग्णांचा बळी घेतला आहे.

**वाशिम** जिल्ह्यात काल २३४ तर आतापर्यंत ७ हजार ६८५ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे.

काल १६६ नवीन रुग्ण आढळल्यामुळे, रुग्ण संख्या ९ हजार २३६ वर पोचली आहे. सध्या १ हजार ३८९ रुग्ण उपचार घेत आहेत. जिल्ह्यात या आजारामुळे, २१८ रुग्णांनी आपला प्राण गमावला आहे.

**जळगाव** जिल्ह्यात काल १४४ रुग्ण कोरोनामुक्त झाले. जिल्ह्यात आतापर्यंत ५७ हजार २५२ रुग्णांनी या आजारावर मात केली आहे. काल ४९२ रुग्णांचा अहवाल पॉझिटिव आल्यामुळे, रुग्णांची एकूण संख्या ६१ हजार ७६६ वर पोचली आहे. सध्या ३ हजार १२५ रुग्ण रुग्णांवर उपचार केले जात आहेत. जिल्ह्यात या आजारामुळे १ हजार ३८९ रुग्णांनी आपला प्राण गमावला आहे.

**रायगड** जिल्ह्यात आतापर्यंत ६१ हजार ४८२ बरे झालेल्या रुग्णांना घरी पाठवलं आहे. काल ९५ नवीन रुग्ण आढळल्यामुळे, रुग्णांचा आकडा ६४ हजार १०९ वर गेला आहे. सध्या ९०६ रुग्ण उपचार घेत आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ७१३ रुग्ण दगावले आहेत.

**सातारा** जिल्ह्यात काल ८८ रुग्ण बरे होऊन घरी गेले. जिल्ह्यात आतापर्यंत ५५ हजार ८७१ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. काल १३१ रुग्णांचे अहवाल पॉझिटीव्ह आल्यामुळे बाधितांचा आकडा ५९ हजार १८३ वर पोचला आहे. जिल्ह्यात या आजारामुळे १ हजार ८५७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

<><><><>

अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य आणि संस्कृती संवर्धन महामंडळाचे निमंत्रक आणि संघटक प्रा सतेश्वर मोरे यांचं काल नागपूरच्या न्यूक्लियस रुग्णालयात निधन झालं. ते ५८ वर्षांचे होते. सतेश्वर मोरे यांनी साहित्यातल्या कवीता, गझल, नाटक, समीक्षा इत्यादी प्रकारांमध्ये लेखन केलं. अनेक आंबेडकरी साहित्य संमेलनांचं संघटन, प्रवर्तन आणि आयोजन करून प्रा मोरे यांनी आंबेडकरी चळवळीला कायम गतिमान ठेवण्याचं कार्य केलं. चळवळीत त्यांचा कृतिशील सहभाग, दलित पँथर चळवळीपासून तर खैरलांजी आंदोलनात कारावास भोगण्यापर्यंत राहिला. मराठी साहित्याच्या अकादमिक क्षेत्रातही ते कार्यरत होते. नागपूर युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशनचे ते सह सचिव, कार्यकारी मंडळाचे महत्वाचे सदस्यही होते.

<><><><>

राज्य साहित्य परिषदेच्या जळगाव शाखेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किसन पाटील यांचं काल संध्याकाळी अल्प आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. डॉ किसन पाटील यांचे ३ कवितासंग्रह आणि एक बालकविता संग्रह प्रसिद्ध असून अनेक समीक्षा आणि संशोधनपर पुस्तकं त्यांनी लिहिली आहेत.

//<><><><>//